**10 वी भारत-लिथुआनिया परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत (13 मार्च 2026)**

13 मार्च 2026

भारत–लिथुआनिया परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीची 10वी फेरी 13 मार्च 2026 रोजी विल्नियस येथे पार पडली. भारतीय बाजूचे नेतृत्व परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव (पश्चिम) श्री. सिबी जॉर्ज यांनी केले होते. लिथुआनियाच्या वतीने श्री. विदमंतास वर्बिक्कास (उपमंत्री, परराष्ट्र व्यवहार लिथुआनिया) यांनी नेतृत्व केले.

2. राजकीय, व्यापार आणि आर्थिक सहकार्य, सांस्कृतिक संबंध आणि नागरिक परस्पर संबंधांसह द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण विस्ताराने उभय बाजूंनी आढावा घेतला. लेझर सहित व्यापार आणि गुंतवणूक आणि उच्च-तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रांमध्ये संबंध अधिक गतिमान करण्याच्या दिशेने चर्चेचा भर होता. उभय देशांनी भारत-युरोपियन युनियन संबंधांवर चर्चा केली आणि परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण केली.

3. या भेटीदरम्यान, सचिव श्री सिबी जॉर्ज यांनी लिथुआनियाचे परराष्ट्र मंत्री महामहिम श्री. केस्तुतीस बड्रीज यांना देखील भेट दिली. तसेच त्यांची पुढीलप्रमाणे संवादसत्रे पार पडली : श्री. लाइमोनास तलात-केल्प्सा (लिथुआनियाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे राजकीय संचालक (परराष्ट्र सचिव) ; श्री. केस्तुतिस कुद्झमानास (लिथुआनियाच्या पंतप्रधानांचे प्रमुख परराष्ट्र धोरण सल्लागार) ; श्री. आल्गिस लाटकास (क्लाइपेडा बंदराचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) ; तसेच श्री. लिनास कोजाला (मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), सेंटर फॉर जिओपॉलिटिकल अँड सिक्युरिटी स्टडीज (GSSC)

4. सचिवांनी लिथुआनिया मधील परदेशस्थ भारतीयांशी देखील संवाद साधला आणि त्यांना विकसित भारत 2047 साठी अमृत कालच्या प्रवासात योगदान देण्याची विनंती केली. त्यांनी दूतावासाच्या नव्या परिसरात आयुष माहिती कक्ष आणि एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) लाउंजचे उद्घाटन केले.

5. नवी दिल्लीमध्ये परस्पर सोयीस्कर तारखेला परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीच्या पुढील फेरीचे आयोजन करण्यास सहमती दर्शविली गेली.

**व्हिलनियस**

**14 मार्च 2026**